सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ४८ | बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

१२ नोव्हेंबर

- पहिली गोलमेज परिषद सुरू झाली.
- महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी राजकीय परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी पुण्यात साडेदहा तासांची बैठक घेतली.
- हा दिवस राष्ट्रीय सार्वजनिक प्रसारण दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- भारतीय महिला ग्रँडमास्टर विजयालक्ष्मी सुब्रह्मण्यम हिने इस्तंबूल, तुर्की येथे झालेल्या 34 व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये वैयक्तिक रौप्य पदक जिंकले.

# दुचाकीस्वारांना टोल का भरावा लागत नाही ?

## ९९ टक्के चालकांना नसेल माहिती कारण!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुमच्या चारचाकी वाहन असेल तर तुम्ही टोल प्लाझावरुन जाताना टोल भरला असेल. पण दुचाकी वाल्यांकडून कधी टोल घेतला जात नाही. असे का असेल? याचा कधी विचार केलाय का? यामागची कारणे जाणून घेऊयात.

दुचाकी वाहने अतिशय हलकी असतात (साधारण १००- २०० किलो). ट्रक (१६- ४० टन) किंवा बसच्या तुलनेत ती रस्त्याच्या पृष्ठभागावर १/१०० व्या हिस्स्याएवढेही नुकसान करत नाहीत. म्हणून सरकारला त्यांच्याकडून टोल घेणे आवश्यक वाटत नाही.

भारतात ७ कोटींहून अधिक दुचाकी वाहने आहेत. यापैकी ८० टक्के पेक्षा जास्त मध्यम व निम्न उत्पन्न गटातील लोक वापरतात. त्यांच्यावर ३०- ५० रुपये टोल लादला तर दररोज १०० कोटींपेक्षा जास्त अतिरिक्त भार पडेल, जो सामाजिकदृष्ट्या अन्याय्य ठरेल. एका मोठ्या टोल प्लाझावरून दररोज १० हजार ते २५ हजार दुचाकी जातात. प्रत्येकाला थांबून ३०- ४० द्यायला लागले, तर १५- २० मिनिटांची रांग लागेल. यामुळे संपूर्ण महामार्ग ठप्प होईल. बाईक/स्कूटर खरेदी करताना



तुम्ही १५ वर्षांसाठी एकरकमी रोड टॅक्स भरता (साधारण ५ हजार ते १५ हजार). हा कर राज्य सरकारला रस्ते दुरुस्तीसाठी जातो. म्हणजे तुम्ही अप्रत्यक्षपणे आधीच " टोल " भरलेले असतात. दुचाकीकडून ३० टोल घ्यायचा झाला, तर त्यासाठी अतिरिक्त २- ३ लेन, १० कर्मचारी, कॅश, फास्ट टॅग, मशीन, सीसीटीव्ही यांची गरज पडेल. एका टोल प्लाझावर हा खर्च दरमहा २०- ३० लाख होईल. जो मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा (१५- २० लाख) जास्त आहे. इंडोनेशिया, व्हिएतनाम, थायलंड, फिलिपिन्स या देशांतही दुचाकींना टोलमधून सूट आहे. फक्त युरोप-अमेरिकेत (जिथे दुचाकी २ टक्के पेक्षा कमी आहेत) टोल घेतला जातो. एनएचएआयने२०२४ मध्ये स्पष्ट केले आहे की, २०३० पर्यंतही दुचाकींना टोलमधून सूट कायम राहणार आहे. कारण जीएनएसस टोलिंग आल्यानंतरही प्रति किलोमीटर ०.१० पेक्षा कमी दर दुचाकींना लागू होणार नाही, जो शून्याएवढाच आहे

भारतीय राष्ट्रीय महामार्ग शुल्क (निर्धारण व संकलन) २००८ च्या नियम ४(४) मध्ये स्पष्ट नमूद आहे की, दुचाकी व तीनचाकी वाहने (मोटारसायकल, स्कूटर, मोपेड) यांना टोल प्लाझावरून पूर्णपणे सूट देण्यात आली आहे. ही कायद्याने मान्यताप्राप्त तरतूद आहे.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...! जय स्वदेशी...!!

**मोटारसायकल चोरट्यांना धडगाव जंगलातून सिनेस्टाईल अटक**

**अशा प्रकारे चहा घेत असाल तर सावधान!**

पान ३ वर

# अमळनेर तालुक्यात गुरे चोरीचे सत्र सुरुच

## पशूधन पालक चिंतित; टोळीचा पर्दाफाश करण्याची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- गेल्या पंधरा दिवसांपासून तालुक्यात गुरे चोरीचे प्रमाण वाढले आहे. एकलहरे, एकतास व निम परिसरात चोरीचे सत्र सुरुच आहे. यामुळे पशूपालक चिंतीत आहेत. गुरे चोरीची मोठी टोळी तालुक्यात सक्रीय झाली आहे. पोलिसांनी चोरट्यांचा छडा लावावा, अशी मागणी पशूपालकांनी केली आहे. एकलहरे येथील प्रफुल्ल सीताराम पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, रविवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ते दूध काढण्यासाठी गेले होते. त्यांच्या गोठ्यात दोन गायी गोठ्यातून चोरीस गेल्या होत्या. एकतास येथील शेतकरी दादाभाऊ बारकु भोई यांची एक गाभण गाय, एक गोऱ्हा, एक वासरू चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. निम येथील श्रीकांत बळीराम चौधरी यांच्या मालकीचा एक खिल्लारी बैल, एक गोऱ्हा, एक पारडू बांधलेल्या ठिकाणाहून चोरीस गेले. शेतकऱ्यांनी आजुबाजूच्या परिसरात शोध घेतला. मात्र, गुरांचा तपास लागला नाही. याप्रकरणी ४४ हजार ५०० रुपये किंमतीची आठ गुरे चोरीस गेल्याचा मारवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हवालदार संजय सूर्यवंशी तपास करीत आहेत.



### टोळीचा बंदोबस्त करण्याची मागणी

तालुक्यात गुरे चोरी करणाऱ्या टोळीने धुमाकुळ घातला आहे. आतापर्यंत शेतकऱ्यांची लाखो रुपयांची गुरे चोरीस गेली आहेत. याप्रकरणी यापूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्यांचा तपास अद्याप लागलेला नाही. पोलिसांनी धडक मोहीम राबवावी. गुरे चोरांचा कायमचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे. आधीच नापिकी आणि अत्यल्प उत्पन्नाने शेतकरी हवालदिल आहेत. त्यातच गुरांचीही चोरी होत असल्याने शेतकरी आथिक विंवचनेत आहेत. या चोरीस आळा घालण्याची गरज आहे.

## कालभैरव जन्मोत्सवानिमित्त सजावट...







*कार्तिक अष्टमीनिमित्त बुधवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी श्री कालभैरवनाथांची जयंती आहे. यानिमित्त श्री मंगळ ग्रह मंदिरात पहिल्या छायाचित्रात श्री मंगळ ग्रह मंदीरातील मुख्य गाभाऱ्याला केलीली विलोभनीय फुलांची सजावट तसेच दुसऱ्या छायाचित्रात मंदिरातील 'त्रिशूलात्मक' स्थित श्री भैरवी माता – कालभैरव भगवान यांच्या मूर्तीला केलेली आकर्षक सजावट.*

(छायाचित्रे : मयूर चौधरी)

# शिरुड येथे मधमाश्यांच्या हल्ल्यात एकाच कुटुंबातील चौघे जखमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- मधमाश्यांनी चढविलेल्या हल्ल्यात एका शेतकरी कुटुंबातील चौघे जखमी झाले आहेत. ही घटना रविवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी सकाळी घडली. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले आहे.

शेतकरी संजय पाटील (वय ४०), त्यांच्या पत्नी छाया पाटील (वय ३५), मुलगी अदिती (वय ११) व मुलगा रोशन (वय ८) हे चौघे रविवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास मोटारसायकलने



शेताकडे जात होते. रस्त्याच्या कडेला असलेल्या एका झाडावर मधमाशांचे पोळ होते. या पोळला एका पक्ष्याने चोच मारल्याने ते फुटले. याच दरम्यान, शेतकरी कुटुंब तेथे असल्याने मधमाश्यांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. मधमाशा अंगावर आल्याने चौघे जण मोटारसायकल तेथेच सोडून ते सैरावैरा पळू लागले. सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या एका पाण्याच्या हौदात उडी मारुन त्यांनी जीव वाचविण्याचा प्रयत्न केला. काही वेळानंतर पाण्यातून ते बाहेर आले. त्यांनी ही घटना निकटवर्तियांना कळविली. त्यांच्या निकटवर्तीयांनी धाव घेऊन त्यांना रिक्षातून खासगी रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर उपचार करुन त्यांना सोमवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी घरी सोडण्यात आले. त्यांनी पाण्यात उड्या मारल्याने त्यांचा जीव वाचला आहे.

# अमळनेर तालुक्यात वाळू माफियांचा हैदोस थांबवा!

## वाळू लिलाव प्रक्रिया सुरु करण्याबाबत काँग्रेसचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तलुक्यात वाळू माफियांनी हैदास माजवला आहे. तो थांबविण्यात यावा व वाळू लिलाव प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी, अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी व जिल्हा सरचिटणीस संदीप घोरपडे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी प्रांताधिकारी मयुर भंगाळे यांना मंगळवार, दि. ११ रोजी निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की तालुक्यात नद्यांमधून वाळू उपसा करण्याचे मांडळ, सावखेडा, जडोद, बोहरा, रुंदाटी, मुंगसे, असे १५ ठिकाण आहेत. मात्र, अमळनेर तालुक्यात शासनाकडून गौण खनिज (वाळू) लिलाव प्रक्रिया (ठेकेदारी) सुरु झालेली नाही. म्हणजे कायदेशीररित्या बांधकामासाठी तालुक्यातील नदीतून वाळू मिळत नाही. आश्चर्याची बाब म्हणजे तालुकाभर अमर्याद लहान, मोठी बांधकामे सुरू आहेत. म्हणजेच तालुक्यातील नद्यांमधून वाळूचा वारेमाप उपसा बेकायदेशीररित्या सुरू आहे. बिनधास्त वाळू चोरी सुरू आहे. यामुळे एक तर शासनाचा महसूल बुडत आहे. बांधकाम करणाऱ्यांना बेकायदेशीर वाळूचे जास्तीचे पैसे मोजावे लागत आहेत. जनतेची आर्थिक लूट होत आहे. वाळू माफियांची बेबंधशाही व गुंडगिरी वाढली आहे. रात्री- बेरात्री वाळू माफीयांच्या ट्रॅक्टर, डंपरच्या आवाजाने लोकांची झोप खराब होत आहे. शासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधींचीही बदनामी होत आहे. वाळू माफिया तरुणांना नशा- पान व पैशांची लालूच दाखवून रात्री वाळू चोरीचे काम करीत आहेत. असाच बेकायदेशीर वाळू उपसा होत राहिला तर, काँग्रेसतर्फे मोठे आंदोलन छेडले जाईल. श्री. सूर्यवंशी व श्री. घोरपडे यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# महाराष्ट्रात बँक कर्मचाऱ्यांना मराठीत बोलावे लागणार

## केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमण यांचे निर्देश



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना ग्राहकांशी अधिक घनिष्ठ नाते निर्माण करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांनी एक महत्त्वपूर्ण सूचना दिली आहे. महाराष्ट्रात राहून मराठी बोलणार नाही, असे अरेरावीने सांगण्याच्या घटना समोर येत असतात. विशेषतः सरकारी कार्यालयांमध्ये असे प्रकार घडतात. महाराष्ट्रातील बँकांमध्ये आता कर्मचाऱ्यांना ग्राहकांशी मराठीतच बोलावे लागणार आहे. याबाबत अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी स्थानिक भाषांमध्ये बोलण्यासंदर्भात स्पष्ट शब्दात निर्देश दिले आहेत.

**ग्राहकांशी मजबूत संबंध बनवा**

बँकांच्या शाखांमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला त्या भागातील प्रादेशिक भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एका कार्यक्रमात त्यांनी ही माहिती दिलीआहे. सिनिअर मॅनेजमेंटला स्थानिक भाषा येत नसली तरी ब्रँच मॅनेजर आणि कर्मचाऱ्यांनी ग्राहकांच्या बोलीभाषेत संवाद साधावा. तसेच भाषिक कौशल्यावर आधारित कामगिरी मूल्यमापनाची शिफारस करण्याचीही त्यांनी तयारी दाखवली आहे.

**भरती प्रक्रियेत सुधारणांची गरज**

बँकिंग क्षेत्रातील नियुक्ती आणि मनुष्यबळ धोरणांमध्ये बदल आवश्यक आहेत. स्थानिक बोली बोलणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देऊन त्यांची निवड केली जावी, त्यांना योग्य मान्यता मिळावी. विविध प्रदेशात प्रादेशिक भाषा बोलणाऱ्या कर्मचाऱ्यांची कमतरता ही गंभीर समस्या आहे. त्याचे कोणतेही समर्थन होऊ शकत नाही. बँकांना ग्राहकांच्या गरजा अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येतील. सेवा अधिक प्रभावी होती.

ग्राहकांशी वैयक्तिक संबंध कमी झाल्याने बँकांना कर्ज मूल्यांकनासाठी क्रेडिट माहिती संस्थांवर अवलंबून राहावे लागते. या संस्था आकडेवारी अपडेट करण्यात वेळ घेतात. ज्यामुळे अनेक पात्र व्यक्तींना कर्ज मिळत नसल्याची स्थिती आहे. पूर्वी बँक अधिकारी स्थानिक ग्राहकांना वैयक्तिकरित्या ओळखत होते. त्यांच्या विश्वासार्हतेची खात्री करत होते. आता ही पद्धत लोप पावली आहे, ज्यामुळे बँकिंग प्रक्रिया अवघड झाली आहे.

**वैयक्तिक संपर्क जोडणे अनिवार्य**

बँक कर्मचाऱ्यांनी आधुनिक डिजिटल साधनांसोबत वैयक्तिक संपर्क जोडणे अनिवार्य आहे. राष्ट्रीयकरणापूर्वीच्या खासगी बँकांनी स्थानिक ग्राहकांसोबत मजबूत बंध निर्माण करून यश मिळवले होते. आजही हे तत्त्व लागू करून बँकांना व्यवसाय वाढवता येईल. तसेच स्थानिक भाषा आणि समजूतदारपणामुळे ग्राहकांची निष्ठा वाढेल आणि बँकांची प्रतिमा उजळेल, असा विश्वासही निर्मला सितारमण यानी व्यक्त केला.

**देशातील सर्वाधिक आश्वासक संस्था बना**

अजूनही अनेक लोक बँकांऐवजी व्याजखोरांकडून कर्ज घेतात. याबद्दल अर्थमंत्री सितारमण यांनी चिंता व्यक्त केली. अलीकडील दोन प्रकरणांचा दाखला देत त्यांनी बँकांना ग्राहकांप्रती अधिक सहानुभूतीपूर्ण असावे, असे सांगितले. कर्जदारांना वारंवार पुरावे आणि कागदपत्रे सादर करण्याची सक्ती न करता, छोट्या मुद्द्यांवर सुधारणा केल्यास बँका देशातील सर्वाधिक आश्वासक संस्था बनू शकतात.

### स्थानिक भाषा म्हणजे नेमकी काय ?

ज्या गावात शहरात बँकेची शाखा आहे, त्या भागातील मुख्य बोलीभाषा सोलापूरमध्ये मराठी, बेळगावात कन्नड, कोल्हापूरात मराठी, धारवाडमध्ये कन्नड, मराठी, शाखेतील प्रत्येक कर्मचाऱ्याला (कॅशियर, मॅनेजर, पीओ) तीच भाषा बोलता यायला हवी. जेणेकरून शेतकरी, छोटे व्यापारी, गृहिणी यांना आपली समस्या आपल्या भाषेत सांगता येईल.

### मराठी, कन्नड बोललं नाही तर काय होणार?

उत्तरः निर्मला सीतारमण यांनी स्पष्ट आदेश दिलाय यापुढे कर्मचाऱ्यांच्या "वार्षिक मूल्यांकनात" (Appraisal) स्थानिक भाषा कितपत येते हेही गुण मिळतील. ज्या शाखेत सर्व कर्मचारी स्थानिक भाषा बोलतात, त्या शाखेला विशेष बक्षीस/प्रोत्साहन मिळू शकतं. ज्या कर्मचाऱ्याला भाषा येत नाही, त्याची बदली दुसऱ्या राज्यात होऊ शकते किंवा ट्रेनिंग अनिवार्य होईल.

### तंत्रज्ञानाशी जोडून राहा

प्रादेशिक भाषा, मानवी संवाद आणि ग्राहकांच्या भावनांची जाणीव नसल्यास बँकिंग यंत्रणा अपूर्ण राहते. तंत्रज्ञानासोबत मानवी घटक टिकवून ठेवणे हेच यशाचे रहस्य आहे. यामुळे बँकांना ग्राहकांची सेवा अधिक चांगली करता येईल. अर्थव्यवस्था मजबूत होईल.




# जेवणानंतर बडिशेप नव्हे ? ‘ हे ’ पदार्थ खाल्ल्यास फायदेशीरच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेवणानंतर बडिशेप आणि साखर खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते. बडिशेपेऐवजी अन्य काही पदार्थांचे सेवनही तितकेच फायदेशीर ठरू शकते. जाणून घ्या. जेवणानंतर कोणते पदार्थ खावेत आणि त्यांचे फायदे काय आहेत.

### हिरवी वेलची

हिरवी वेलची केवळ अन्नाची चव वाढवत नाही, तर तोंडाची दुर्गंधी दूर करते आणि पोटातील पाचक एन्झाइम्स सक्रिय करते. जेवणानंतर एक हिरवी वेलची तोंडात ठेवल्याने पचनक्रिया सुधारते आणि तोंडाला ताजेपणा मिळतो.

### लवंग

लवंगेमध्ये युजेनॉल नावाचे अँटिसेप्टिक गुणधर्म असलेले रसायन असते. हे दात आणि हिरड्यांसाठी फायदेशीर आहे. जेवणानंतर एक लवंग चघळल्याने तोंडाची दुर्गंधी दूर होते आणि पचनक्रियेला चालना मिळते.



### पुदिन्याची पाने

पुदिन्याची पाने तोंडाला ताजेपणा देतात आणि दुर्गंधी दूर करतात. रात्रीच्या जेवणानंतर २-३ पुदिन्याची पाने चघळणे फायदेशीर आहे. मात्र, ॲसिडिटीचा त्रास असणाऱ्यांनी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

### जिरे आणि ओवा

जेवणानंतर जिरे आणि ओवा खाल्ल्याने पचन सुधारते, पोटफुगी आणि गॅसचा त्रास कमी होतो. तज्ज्ञांच्या मते, हे पदार्थ वजन नियंत्रणात ठेवण्यासही मदत करतात.

### धणे पाणी

धणे पाणी पचनक्रिया सुरळीत करते, ॲसिडिटी कमी करते आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते. यातील फायबर आणि अँटिऑक्सिडंट्समुळे पोट फुगण्याची समस्या कमी होते आणि शरीराला थंडावा मिळतो. जेवणानंतर बडीशेपेऐवजी हिरवी वेलची, लवंग, पुदिन्याची पाने, जिरे-ओवा किंवा धणे पाणी यांचे सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते आणि आरोग्याला अनेक फायदे मिळतात. मात्र, कोणत्याही नवीन पदार्थाचे सेवन करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे उचित ठरेल.

# डीयू की गोल्ड मेडलिस्ट, यूपीएससी आईएसएस टॉपर, टीचर की बेटी कशिश कसाना का सक्सेस मंत्र



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मेरठ की कशिश कसाना ने यूपीएससी इंडियन स्टैटिस्टिकल सर्विस २०२५ परीक्षा में टॉप करके सबका ध्यान खींचा है। दिल्ली यूनिवर्सिटी से स्टैटिस्टिक्स में गोल्ड मेडल हासिल करने वाली

## सक्सेस स्टोरी

कशिश की कहानी सिर्फ एक परीक्षा पास करने की नहीं, बल्कि आत्मविश्वास, जुनून और मेहनत की है। उन्होंने सेल्फ स्टडी और ऑनलाइन स्टडी मटेरियल की मदद से यह उपलब्धि हासिल की। बचपन से ही गणित और स्टैटिस्टिक्स में उनकी गहरी रुचि थी। उनके सफलता के पीछे उनका ‘ थ्री डी ’ फॉर्मूला - डिसीजन, डिवोशन और डिसिप्लिन - अहम रहा।

### पारिवारिक पृष्ठभूमि और प्रेरणा

कशिश के पिता जितेंद्र कसाना रजपुरा विकासखंड में एडीओ कोऑपरेटिव के पद पर कार्यरत हैं, जबकि मां रेखा प्राइमरी स्कूल में शिक्षिका हैं। माता-पिता ने कशिश को हमेशा पढ़ाई के लिए प्रेरित किया, लेकिन सफलता का रोडमैप उन्होंने खुद तैयार किया। कशिश ने एमएससी की पढ़ाई के साथ-साथ यूपीएससी की तैयारी शुरू की। दोनों बड़े लक्ष्यों में सफलता हासिल कर उन्होंने साबित किया कि सही टाइम मैनेजमेंट से दो बड़े लक्ष्य एक साथ हासिल किए जा सकते हैं।

### शैक्षणिक सफर

कशिश ने मेरठ के केएल इंटरनेशनल स्कूल से स्कूली शिक्षा पूरी की। इसके बाद दिल्ली यूनिवर्सिटी के प्रतिष्ठित लेडी श्रीराम कॉलेज से स्टैटिस्टिक्स ऑनर्स की डिग्री हासिल की। इस विषय में उनकी रुचि इतनी गहरी थी कि उन्होंने इसी विषय में एमएससी किया और गोल्ड मेडल प्राप्त किया। अपने पूरे शैक्षणिक करियर में कशिश ने गणित और स्टैटिस्टिक्स में लगातार उत्कृष्ट प्रदर्शन किया।

### यूपीएससी आईएसएस में सफलता

कशिश को स्कूली दिनों में ही यूपीएससी आईएसएस परीक्षा के बारे में पता चल गया था। उन्हें टॉप करने की उम्मीद नहीं थी, लेकिन पास होने का भरोसा था। उन्होंने बिना किसी कोचिंग के, सेल्फ स्टडी और ऑनलाइन संसाधनों की मदद से तैयारी की। उनका ‘थ्री डी’ फॉर्मूला - निर्णय, समर्पण और अनुशासन - सफलता का आधार बना। कशिश का कहना है, “दिन में एक घंटा ही सही, लेकिन मन लगाकर पढ़ाई करें।”

### सफलता का मंत्र

कशिश ने साबित किया कि मेहनत, अनुशासन और सही दिशा में किए गए प्रयास सफलता दिलाते हैं। उन्होंने एक साथ दो बड़े लक्ष्यों को हासिल करके दिखाया। उनके अनुसार, सफलता के लिए लंबे समय तक पढ़ाई से ज्यादा मन से की गई पढ़ाई और स्पष्ट लक्ष्य जरूरी हैं। उनकी यह कहानी उन युवाओं के लिए प्रेरणादायक है, जो बड़े सपने देखते हैं, भले ही संसाधन सीमित हों। कशिश कसाना ने अपनी मेहनत और जुनून से दिखा दिया कि सही योजना और आत्मविश्वास के साथ कोई भी लक्ष्य हासिल किया जा सकता है।

# दीड कोटीची कार घेण्यासाठी बैलगाडीतून शोरूमला पोहोचला शेतकरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोशल मीडियावर दररोज असंख्य व्हिडिओ व्हायरल होतात. त्यापैकी काहीच नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतात. असाच एक व्हिडिओ सध्या तुफान व्हायरल होतो आहे. ज्यामुळे नेटकरी थक्क झाले आहेत. बेंगळुरूचा शेतकरी एसएसआर संजू दीड कोटींची लक्झरी कार घेण्यासाठी चक्क बैलगाडीने शोरूमला पोहोचला. कुर्ता-धोतर, सोन्याची चैन आणि अंगठ्या घालून आलेल्या या शेतकऱ्याचा देसी स्वॅग पाहून शहरातील नागरिकही आश्चर्यचकित झाले.



### नाद असावा तर असा!

‘ नाद असावा तर असा! ’ हे वाक्य संजूवर अगदी बरोबर बसते. त्यांच्या या स्टाइलने रस्त्यावर प्रत्येकाचे लक्ष वेधले. बैलगाडीतून निघालेल्या संजूला पाहून लोक विचार करू लागले, की हा नेमका जातो कुठे? हा व्हिडिओ सोशल मीडियावर धुमाकूळ घालत असून, लाखो लोकांनी तो पाहिला आहे.

### संजू कोण आहेत?

एसएसआर संजू हे बेंगळुरूचे श्रीमंत शेतकरी आहेत. जे त्यांच्या लक्झरी कार कलेक्शनसाठी ओळखले जातात. त्यांच्या गॅरेजमध्ये पोर्श पॅनामेरा, फोर्ड मस्टँग, मासेराती लेवांटे, टोयोटा इनोवा हायक्रॉस आणि टोयोटा फॉर्च्युनर सारख्या महागड्या गाड्या आहेत. यावेळी त्यांनी दीड कोटींची नवीन टोयोटा वेलफायर घेण्याचा निर्णय घेतला आणि डिलिव्हरी संस्मरणीय बनविली.

### व्हिडिओतील किस्सा

यूट्यूबवर अपलोड झालेल्या ‘ शेतकरी आलिशान गाडी खरेदी करत आहे ’ या व्हिडिओमध्ये संजू आपल्या टीमला गाड्या तयार करण्याचे आदेश देताना दिसतात. त्यांच्या ऑफिसबाहेरील रस्त्यावर त्यांच्या कलेक्शनची रांग लागली होती. कर्मचारी गाड्यांमध्ये निघून गेल्यानंतर संजू मागे राहिले. दुसरी सवारी मागविली पण ती होती बैलगाडी! पारंपरिक वेशभूषेत बैलगाडीवर चढलेले संजू शोरूमकडे रवाना झाले. शोरूमला पोहोचल्यावर संजूने नवीन वेलफायरसाठी पारंपरिक पूजा केली. कर्मचाऱ्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. लाल कापडात गुंडाळलेली पांढऱ्या रंगाची कार अनावरण केली. संजू यांनी चाव्या घेतल्या आणि हसत म्हणाले, की देसी शैलीतही लक्झरीचा आनंद घेता येतो. नंतर ते गाडी घेऊन घरी परतले.

### टोयोटा वेलफायरची वैशिष्ट्ये

दीड कोटी रुपयांच्या या टोयोटा वेलफायर ही लक्झरी एमपीव्ही कार तिच्या वर्गातील सर्वात प्रीमियम मॉडेल मानली जाते. यात दोन कॅप्टन सीट्स, ३६० कॅमेरा, व्हेंटिलेटेड आणि हीटेड सीट्स, डिजिटल इंस्ट्रुमेंट क्लस्टर आणि हायब्रिड इंजिन यांसारखी वैशिष्ट्ये आहेत. अडीच लिटर पेट्रोल इंजिन १९३ पीएस पॉवर निर्माण करते. ज्यामुळे ही कार आरामदायी आणि शक्तिशाली आहे.

### नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया

संजूच्या या स्टाइलमुळे सोशल मीडियावर नेटकऱ्यांनी अनेक कमेंट्स केल्या आहेत. ‘ हा खरा भारतीय स्वॅग आहे! असे म्हणत ते त्यांच्या कृतीचे कौतुक करत आहेत. अनेकांनी म्हटले, की ही फक्त दिखावा नव्हती, तर परंपरेशी जोडलेल्या नात्याचे प्रतीक आहे. एक शेतकरीही राजेशाही असू शकतो, फक्त स्टाइलची गरज असते, असे कमेंट्स पाहायला मिळत आहेत. संजूच्या बैलगाडीने हे सिद्ध केले, की भारतीय हृदय आणि परंपरा असतील तर प्रत्येक सवारी खास बनते.

# ‘ कमबॅक क्वीन ’ स्नेह राणाची कमाल!

## पाकविरुद्ध साधला मोठा डाव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताच्या महिला वन डे विश्वचषक २०२५ मधील दमदार कामगिरीने भारतीय महिला संघाने गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. या यशात अनुभवी अष्टपैलू स्नेह राणाने मोलाची भूमिका बजावली आहे. ती यंदाच्या विश्वचषकात भारतासाठी ‘ हुकमाची राणी ’ ठरू शकते.



### पाकविरुद्ध दमदार कामगिरी

श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात चमक दाखविणाऱ्या स्नेह राणाने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात दोन विकेट्स घेतल्या. यंदाच्या विश्वचषकातील दोन सामन्यांत तिने ४ विकेट्स घेतल्या असून, २०२५ या कॅलेंडर वर्षात ती २५ विकेट्ससह सर्वाधिक विकेट्स घेणारी गोलंदाज ठरली आहे.

### अष्टपैलू प्रतिभा

३१ वर्षीय स्नेह राणा उजव्या हाताने ऑफ-स्पिन गोलंदाजी आणि प्रभावी फलंदाजी करण्यात पारंगत आहे. तिच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे भारताला विश्वचषकात इतिहास रचण्याची संधी आहे. तिच्या गोलंदाजीबरोबरच गरज पडल्यास फलंदाजीतील योगदानही तिला संघासाठी महत्त्वाची बनविते.

### प्रेरणादायी कमबॅक

२०१४ मध्ये भारतीय संघात पदार्पण केल्यानंतर २०१६ मध्ये गुडघ्याच्या दुखापतीमुळे स्नेहला संघातून बाहेर जावे लागले. पण तिने हार मानली नाही. देशांतर्गत क्रिकेटमध्ये स्वतःला सिद्ध करत तिने पाच वर्षांनी २०२१ मध्ये दमदार पुनरागमन केले. इंग्लंड दौऱ्यात कसोटी सामन्यात तिने ४ विकेट्स घेतल्या आणि दुसऱ्या डावात ८० धावांची खणखणीत खेळी करून सर्वांचे लक्ष वेधले. या कामगिरीने तिला ‘कमबॅक क्वीन’ हे नाव मिळाल.

### आकडेवारीतून स्नेहचा दबदबा

स्नेहने वनडेत ४० सामन्यांत २७ डावात ३२९ धावा केल्या, ज्यात एक अर्धशतक आहे. गोलंदाजीत ४० डावांत तिने ५४ विकेट्स घेतल्या आहेत. यापैकी जवळपास निम्म्या विकेट्स तिने यंदाच्या वर्षात घेतल्या. ही आकडेवारी तिच्या सध्याच्या दमदार फॉर्मचा पुरावा आहे.

### विश्वचषकातील ट्रम्प कार्ड

स्नेह राणाच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे ती यंदाच्या महिला वनडे विश्वचषकात भारतासाठी गेम-चेंजर ठरू शकते. तिची गोलंदाजी, फलंदाजी आणि मैदानावरील चपळता भारताला विश्वविजेतेपदाच्या जवळ नेवू शकते.

# विमान प्रवासात कोरड्या नारळाला बंदी का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



विमान प्रवासादरम्यान कोरड्या नारळाला (सुकलेल्या नारळाला) बरोबर नेण्यास बहुतेक विमान कंपन्या परवानगी देत नाहीत. यामागे काही महत्त्वाची सुरक्षा आणि तांत्रिक कारणे आहेत. खालीलप्रमाणे ही कारणे समजावून सांगितली आहेत.

१) कठीण कवचामुळे शस्त्राचा धोका

कोरड्या नारळाचे बाह्य कवच अत्यंत कठीण असते. ज्यामुळे ते शस्त्रासारखे वापरले जाऊ शकते. विमानातील सुरक्षेसाठी अशा कठीण वस्तूंवर बंदी घातली जाते.

२) हवेच्या दाबामुळे फुटण्याचा धोका

विमान जास्त उंचीवर गेल्यावर हवेच्या दाबात बदल होतो. यामुळे कोरड्या नारळाच्या कवचात तणाव निर्माण होऊन ते फुटण्याची किंवा क्रॅक होण्याची शक्यता असते. ज्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो.

३) व्हेंटिलेशन सिस्टीमवर परिणाम

जर नारळ फुटला, तर त्याचे तुकडे किंवा आत पदार्थ विमानाच्या व्हेंटिलेशन सिस्टीममध्ये अडकू शकतात. यामुळे सिस्टीममध्ये बिघाड होण्याची शक्यता असते.

४) एक्स-रे तपासणीत अडचण

कोरड्या नारळाचे कठीण कवच एक्स-रे मशीनद्वारे तपासणे कठीण असते. यामुळे सुरक्षा कर्मचाऱ्यांना नारळातील अंतर्भाग नीट तपासता येत नाही. ज्यामुळे संभाव्य धोका टाळण्यासाठी बंदी घातली जाते.

५) आपातकालीन परिस्थितीत धोका

आपातकालीन परिस्थितीत कोरड्या नारळासारख्या कठीण वस्तू धोकादायक ठरू शकतात. त्या प्रवाशांना किंवा विमानाच्या उपकरणांना इजा पोहोचवू शकतात.

६) द्रव पदार्थांवरील निर्बंध (मर्यादित तथ्य)

कोरड्या नारळात सामान्यतः पाणी नसते. परंतु काही प्रकरणांत थोडा ओलसरपणा असू शकतो. विमानात १०० मि.ली.पेक्षा जास्त द्रव पदार्थांवर बंदी असल्याने हा नियम काहीवेळा कोरड्या नारळाला लागू होऊ शकतो.

७) विमान कंपन्यांचे धोरण

या कारणांमुळे बहुतेक विमान कंपन्या कोरड्या नारळाला केबिन बॅगेजमध्ये नेण्यास मनाई करतात. काही कंपन्या चेक-इन सामानात (लगेज) कोरड्या नारळाला परवानगी देतात. परंतु यासाठी आधी विमान कंपनीच्या नियमांची खात्री करणे आवश्यक आहे. विमान प्रवासात कोरड्या नारळावर बंदी असण्यामागे सुरक्षा आणि तांत्रिक कारणे आहेत. प्रवाशांनी विमान कंपनीच्या नियमांचे पालन करून प्रवास सुरक्षित आणि सुलभ ठेवावा.

# आधी ६० कोटी जमा करा!

## बॉम्बे हायकोर्टाने शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्राला फटकारले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुंबई उच्च न्यायालयाने ८ ऑक्टोबर २०२५ रोजी उद्योगपती राज कुंद्रा आणि अभिनेत्री शिल्पा शेट्टी यांना कठोर शब्दांत सुनावले. परदेश दौऱ्यासाठी परवानगी मागणाऱ्या या जोडप्याला न्यायालयाने सांगितले, की परदेशात जायचे असेल, तर आधी ६० कोटी रुपये जमा करा. मगच याचिकेचा विचार करू. हे प्रकरण मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या (EOW) तपासातील ६० कोटींच्या फसवणुकीशी जोडलेले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १४ ऑक्टोबरला ठेवली आहे.

### निमंत्रण पुरावा नसल्याने कोर्टाचा नकार

शिल्पा शेट्टीने श्रीलंकेतील कोलंबो येथील यूट्यूब इव्हेंटसाठी (२५ ते २९ ऑक्टोबर) परवानगी मागितली होती. न्यायालयाने कार्यक्रमाचे निमंत्रण किंवा लेखी पुरावा मागितला. शिल्पाच्या वकिलाने सांगितले, की परवानगी मिळाल्यानंतरच संपर्क साधला जाईल. हे कारण न्यायालयाने नाकारले आणि फसवणुकीची संपूर्ण रक्कम जमा करण्याची अट घातली. मुख्य न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती आर. एन. भद्कंबरे यांच्या खंडपीठाने हे स्पष्ट केले.

### अटक टळली कारण तपासात सहकार्य

राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टीविरुद्ध ६० कोटींच्या फसवणुकीचा आरोप आहे. EOW ने त्यांना लुकआऊट सर्क्युलर (LOC) जारी केले असून, विमानतळावर दिसताक्षणी ताब्यात घेण्याचे निर्देश दिले आहेत. व्यावसायिक आणि कौटुंबिक कारणांसाठी परवानगी केल्याचा दावा केला. न्यायालयाने मात्र म्हटले, की तुम्ही सहकार्य केल्यामुळेच अद्याप अटक झालेली नाही. अन्यथा सवडीनुसार परवानगी मिळू शकत नाही.



### ६० कोटींच्या फसवणुकीची पार्श्वभूमी

मुंबईचे व्यावसायिक दीपक कोठारी यांनी १३ ऑगस्ट २०२५ रोजी जुहू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली, जी EOW कडे हस्तांतरित झाली. कोठारींचा आरोप आहे की, २०१५ मध्ये शिल्पा आणि राज कुंद्रांच्या आता बंद पडलेल्या ‘ बेस्ट डील टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड ’मध्ये कंपनी त्यांनी ६०.४८ कोटी गुंतवले (३१.९५ कोटी एप्रिल २०१५ मध्ये आणि २८.५३ कोटी सप्टेंबर २०१५ मध्ये). हे कर्ज-गुंतवणूक म्हणून दाखविले गेले. पण वैयक्तिक खर्चासाठी वापरले गेले. EOW ने भारतीय दंडसंहितेच्या कलम ४०३ (अवैध मालमत्ता हस्तगत करणे), ४०६ (विश्वासघात) आणि ३४ (सह-कट रचने) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. काही आठवड्यांपूर्वी शिल्पाची ४.५ तासांची चौकशी झाली होती, तर राज कुंद्राचीही EOW ने विचारणा केली आहे.

### जोडप्याची भूमिका

शिल्पा आणि राज कुंद्रांनी आरोप नाकारले असून, हे प्रकरण सिव्हिल आहे. राष्ट्रीय कंपनी कायदा ट्रिब्युनल (NCLT) ने ४ ऑक्टोबर २०२४ रोजी यावर निकाल दिला आहे, असा दावा केला आहे. मात्र, EOW चा तपास सुरू असून, पाच जणांच्या जबानी नोंदवल्या गेल्या आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# वडिलांना १ कोटी पगार, तरी घरात कोणीही समाधानी नाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एका युजरने त्याला वडिलांच्या जुन्या सॅलरी स्लिप सापडल्यानंतर एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे. त्याचे वडील आता ५० वर्षांचे आहेत. त्यांचे वार्षिक उत्पन्न सुमारे १ कोटी रुपये आहे. तर त्यांना, २०१० मध्ये वार्षिक फक्त ३. २ लाख रुपये पगार होता. तरीही, ती त्यांच्या आयुष्यातील सर्वात आनंदी वर्षे होती, असे म्हटले आहे. पोस्टमध्ये म्हटले आहे, की त्यावेळी त्यांचे कुटुंब दर आठवड्याला मॉलमध्ये जात होते. चित्रपट पाहत होते. बाहेर जेवण करत होते. ब्रँडेड कपडे खरेदी करत होते. वडिलांनी त्यांना हे सर्व त्या माफक उत्पन्नात पुरवले होते. त्याच्या वडिलांनी त्यांच्यावर कधीही आर्थिक ताण येऊ दिला नाही. घरात आनंद आणि समाधान होते. मात्र, २०१७- १८ च्या सुमारास परिस्थिती बदलली. बाहेर जाणे थांबले आणि हळूहळू आनंदाची जागी तणाव वाढू लागला. त्याच्या वडिलांचे उत्पन्न झपाट्याने वाढले असले तरी, कुटुंबातील अंतरही वाढले. वारंवार भांडणे होऊ लागली. संभाषणे आणि भावनिक नात्यांमध्ये अंतर वाढले. आता त्याचे वडील वर्षाला जवळजवळ १ कोटी कमावतात. मात्र, घरात कोणीही आनंदी नाही. सतत भांडणे होत असतात. मला माहित आहे की, आधीही भांडणे होत होती. मात्र, आता मला सर्वकाही अधिक स्पष्टपणे जाणवते आहे. त्याने पुढे म्हटले आहे, की मला वाटत नाही की मी कधीही त्यांच्यासारखा होऊ शकेल. जेव्हा आमच्याकडे खूप कमी पैसे होते, तेव्हा त्यांनी आमच्या घरात कोणताही तण-तणाव नव्हता. मात्र, आता आमच्याकडे खूप काही आहे, तरीही असे वाटते की कुटुंब वेगळे झाले आहे. युजरने पोस्टच्या शेवटी असे म्हटले आहे, की आता त्याचे पालक क्वचितच बोलतात. त्यालाही त्यांच्यापासून दूर गेल्याचे वाटते. मी कदाचित कॉलेजनंतर घरातून बाहेर पडेल. सगळ्याच गोष्टी बिघडल्यासारख्या वाटत आहेत. यावर अनेकांनीप्रतिक्रिया दिल्या आहेत. त्यापैकी एकाने म्हटले की, वयानुसार, जबाबदाऱ्या आणि ताणतणावानुसार लोक बदलतात. त्यामुळे तुम्ही जे अनुभवत आहात ते अनेक घरांमध्ये घडते. एकाने असे म्हटले आहे, की तुम्हाला असे का वाटते की पैशामुळे अशी परिस्थिती निर्माण होते? ते व्यभिचारासारख्या काही वाईट सवयींमध्ये अडकले आहेत का? जे मध्यमवयीन पुरुषांमध्ये सामान्य आहे. ▲



# मोटारसायकल चोरट्यांना धडगाव जंगलातून सिनेस्टाईल अटक

## अमळनेर पोलिसांची कामगिरी; पोलीस अधीक्षकांकडून कौतुकाची थाप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

### तब्बल १६ लाखांच्या २४ मोटारसायकल जप्त



अमळनेर : शहरातील विविध भागातून मोटारसायकल चोरीस गेल्या होत्या. याप्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल झाले होते. चोरट्यांचा पोलिस कसून शोध घेत होते. तपासाची चक्रे गतीमान करुन पोलिसांना अखेर मोटारसायकल चोरणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांचा तपास लागला. पोलिसांच्या पथकाने धडगाव येथील जंगलातून दोघांना सिनेस्टाईल अटक केली आहे. या कारवाईत तब्बल १६ लाखांच्या २४ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत. याप्रकरणी पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी येथील पोलीस ठाण्यात पत्रकार परिषदेत या घटनेची सविस्तर माहिती दिली. विशेष म्हणजे श्री. रेड्डी यांनी अमळनेर पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक करुन त्यांना रोख बक्षीसह दिले आहे. याप्रसंगी पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज उपस्थित होते.

दीर्घकाळापासून अमळनेर शहर व तालुक्यातून रोज मोटारसायकल चोरीस जात होत्या. यामुळे नागरिक चांगलेच धास्तावले होते. पोलिसांनीही याचे गांभिर्य लक्षात घेता चोरट्यांचा कसून तपास करत होते. पोलिसांचे पथक नेमून ते विविध भागात रवाना करण्यात आले होते. या पथकाने तांत्रिक माहितीवरुन चोरट्यांचा शोध घेतला. विविध भागातील सीसीटीव्ही कॅमेरा तपासणी करुन चोरट्यांचे चेहरे निष्पन्न झाले होते. हिंमत रेहंज्या पावरा व अंबालाल भुरट्या खर्डे (रा. सातपिंप्री, ता. शहादा, जि. नंदुरबार) येथील हे आरोपी असल्याचे सिद्ध झाले होते. हे दोन्ही आरोपी जंगलात विविध ठिकाणी लपत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. अखेर पोलिसांनी जंगल जंगल पछाडले. सिनेस्टाईल पाठलाग करुन दोघांना धडगाव येथील जंगलातून ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांना खाक्या दाखवताच दोघांनी विविध भागातून १५ लाख ६३ हजार रुपयांच्या २४ मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. या मोटारसायकल गरिबांना विकल्याचेही दोघांनी सांगितले. जंगलातील विविध भागातून या मोटारसायकल पोलिसांनी हस्तगत केल्या. पोलिसांनी त्यांना अटक करुन सोमवार, दि. १० नोव्हेंबर रोजी न्यायालयात हजर केले असता दोघांना पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. हेड कॉन्स्टेबल काशिनाथ पाटील, सागर साळुंखे तपास करीत आहेत. ▲

### यांचा होता पथकात समावेश....

पोलिस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर, पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, प्रशांत पाटील, गणेश पाटील, उज्वलकुमार म्हस्के, नितीन मनोरे, उज्वल पाटील, हितेश बेहरे यांचा पथकात समावेश होता.

# मारवड- गोवर्धन येथे आज श्री कालभैरवनाथांचा यात्रोत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर- तालुक्यातील मारवड-गोवर्धन येथील माळण नदी पात्रात बुधवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी श्री काळभैरवनाथांचा यात्रोत्सव होणार आहे. यानिमित्त खानदेशातील भाविकांची नवस फेडण्यासाठी मोठी गर्दी उसळणार आहे. यात्रोत्सवानिमित्त मंदिर संस्थानतर्फे जय्यत तयारी करण्यात आली आहे.

स्वयंभू मानले जाणारे श्री काळभैरवनाथांचे हे मंदिर परिसरातील भाविकांचे आराध्य दैवत आहे. सालाबादप्रमाणे कार्तिक अष्टमीला श्री कालभैरवनाथांचा यात्रोत्सव असतो. बुधवारी सकाळी साडेसात वाजता मान्यवरांच्या हस्ते महायज्ञ पूजन, ध्वजारोहण व मंगल आरती होईल. त्यानंतर नऊ वाजेपासून महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम सुरु होईल. यात्रोत्सवानिमित्त परिसरातील आबालवृद्ध दिवसभर सेवा देतात. माळण नदी पात्रात पाळणे, झुले, पूजा- साहित्य, विविध खाद्य पदार्थ, खेळणी विक्रेत्यांनी दुकाने थाटली आहेत. पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने यात्रोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर संस्थानतर्फे करण्यात आले आहे. ▲

## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# खानदेश साहित्य संघाच्या जिल्हाध्यक्षपदी धनगर, सचिवपदी काटे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**





अमळनेर - खानदेश साहित्य संघाच्या जळगाव जिल्हाध्यक्षपदी कवी शरद धनगर, तर जिल्हा सचिवपदी पत्रकार उमेश काटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

खानदेश साहित्य संघाचे केंद्रिय अध्यक्ष प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी यांनी दोघांची तीन वर्षाकरिता नियुक्ती केली आहे. जेष्ठ साहित्यिक डॉ. फुला बागुल, अहिराणी साहित्यिक सुभाष अहिरे, जेष्ठ साहित्यिक डॉ. सयाजी पगार, कवी कैलास भामरे, केंद्रीय कार्यकारणी सदस्या रत्नाताई पाटील, प्रा रमेश राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत खानदेश साहित्य संघाचे केंद्रिय सचिव रमेश बोरसे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्रक देण्यात आले. शरद धनगर यांनी 'कोण होणार करोडपती?' या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. नवी दिल्लीत येथे साहित्य अकादमी आयोजित 'साहित्योत्सव' या राष्ट्रीय साहित्य संमेलन, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (उस्मानाबाद), अमळनेर येथे आयोजित पहिल्या अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन, बेळगाव येथे आयोजित मराठी भाषा साहित्य संमेलनात ते निमंत्रित कवी म्हणून सहभागी होते. उमेश काटे हे गेल्या २५ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी अनेक विषयांवर लिखाण केले आहे. सध्या ते महाराष्ट्र साहित्य परिषदच्या कोषाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत आहेत. अमळनेर येथे झालेल्या ९७ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन व तसेच धुळे येथे झालेल्या अखिल भारतीय अहिराणी साहित्य संमेलनात ही सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली आहे. त्यांच्या निवडीबद्दल मराठी वाङमय मंडळ, पूज्य साने गुरुजी मोफत वाचनालय व ग्रंथालय, शिवशाही फाउंडेशन, साने गुरुजी शैक्षणिक विचार मंच, 'मसाप' शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# अशा प्रकारे चहा घेत असाल तर सावधान!

## प्रसिद्ध गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्टचा सल्ला ऐका!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चहाला वेळ नसते पण वेळेला चहा हवाच, असे म्हटले जाते. मात्र, तूम्ही जर चूकीच्या पद्धतीने चहा घेत असाल, तर तुमच्या आरोग्यासाठी ते धोकादायक असल्याचे अंबानी हॉस्पिटलच्या गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट डॉ. दीपक भांगले यांनी म्हटले आहे.

भारतात आपण कोणाचे स्वागत करताना त्यांना चहा देत असतो. अनेकांची सकाळ तर चहा प्यायल्याशिवाय होतच नाही. त्यामुळे चहा पिण्याचे प्रमाण आपल्याकडे सर्वाधिक आहे. अनेकांना दूधाचा चहा पसंत असतो. काहीजण कोरा चहाच पिणे पसंत करतात. मात्र, कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलचे प्रसिद्ध गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट यांनी चहा पिताना सावध राहाण्याचा सल्ला दिला आहे. त्यांनी सांगितले, आहे, की चहा पिण्याची सवय मूळात चांगली नाही. शक्य तितक्या लवकर ती सोडावी.



जेवढा जास्त चहा प्याल तेवढे प्रकृतीसाठी चांगले नाही. त्यात जर तुम्ही चुकीच्या पद्धतीने चहा पित असाल तर तुमच्या पोटासाठी ते चांगले नाही.

**कसे पिता चहा?**

बहुतांशी लोक चहा पिताना सकाळी रिकाम्या पोटी पितात. तिही कडक चहा पितात. चहा सोबत बिस्कीट, टोस्ट, खारी, मठरी खातात. चहा पिण्याची ही पद्धत हळूहळू तुमच्या लिव्हरला डॅमेज करु शकते. आतड्यांचेही नुकसान करु शकते. चहात टॅनिन नावाचे तत्व असते. जे शरीरात मिसळते. जर तुम्ही खूप कडक चहा पित असाल तर त्याने पोटात ॲसिडीटी आणि छातीत जळजळ होऊ शकते.

**चहा आणि स्नॅक्स**

चहा सोबत मसालेदार, तळलेले भाजलेले स्नॅक्स पदार्थ खात असाल तर हे पोटाच्या पडद्याला (अस्तराला) कमजोर करतात. त्यामुळे पोटात अधिक एसिड तयार होते. जेऊन उशीरा पचते. त्यामुळे पोटदुखी, अपचन, बद्धकोष्ठतेची समस्या होऊ शकते. तुम्ही चहाचे प्रमाण थोडे कमी करु शकले तर ते चांगले आहे. जर करु शकत नसाल तर चहा कधीही उपाशी पोटी पिऊ नका. हल्का नाश्ता करुन चहा प्यावा. नाश्त्यात काहीही हेल्दी पर्याय निवडा. सकाळी आधी कोमट पाणी प्या. नंतर चहा पिऊ शकता. हर्बल आणि आल्याचा चहा प्या आणि त्यात साखर कमी टाका. साखर आतड्यातील गुड बॅक्टेरियांना संपवते. ▲

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# कालभैरव

कालभैरव म्हणजे शिवाचे उग्र व भीषण असे एक रूप. पंचमुखी शिवाच्या दक्षिणेकडील मुखालाही भैरव म्हणतात. तसेच भैरव हा शिवाचा एक प्रमुख गण असल्याचेही मानले जाते. पुराणांनुसार भैरवाने जन्मल्याबरोबर सर्व देवांचे दमन केले. म्हणून शिवाने त्याला वृक्ष होण्याचा शाप दिला. तोच दमनक वा तातिरी हा वृक्ष होय. त्याची पूजा केल्याखेरीज देवांच्या पूजेचे फल मिळणार नाही, असा शिवाने उःशाप दिला. ब्रह्मदेवाने शंकराचा अपमान केल्यावर त्याच्या क्रोधाग्नीतून काळ्या रंगाचा भैरव जन्मला, त्याने ब्रह्माचे शिवनिंदा करणारे पाचवे मस्तक तोडले. सर्व तीर्थांना जाऊनही भैरवाचे ब्रह्महत्येचे पाप नष्ट झाले नाही. शेवटी काशीत त्याला पापमुक्ती मिळाली व त्याने ब्रह्म्याचे मस्तक जेथे ठेवले, तेथे कपालमोचनतीर्थ बनले. कालिकापुराणाच्या मते पार्वतीच्या शापाने महाकाल हा गण भैरवाच्या रूपाने जन्मला. कार्तिक वद्य अष्टमीला भैरवजयंती हे काम्यव्रत केले जाते.

गळ्यात नरमुंडमाला हातात नरमुंड अंगावर हत्तीचे कातडे सापाचे दागिने चार, आठ, बारा वा अधिक हातांतून तलवार, बाण, त्रिशूळ, दोरी आदी आयुधे ५ चेहरे आदी रूपांतील भैरव नावाप्रमाणेच उग्र भासतो. दांडगाई करणाऱ्या माणसाला 'टोळभैरव' म्हणतात, याचे कारणही भैरवाची उग्रताच होय. महाराष्ट्रातील त्याच्या मूर्ती नग्न, तर ओरिसातील मूर्ती विश्वपद्मावर उभ्या असतात. तेथील काही मूर्ती तीन डोळे व मिशा असलेल्या, तर काही मूर्ती तिसरा डोळा आणि मिशा यांचा अभाव असलेल्या असतात. राजस्थानातील प्रत्येक गावात शमी वृक्षाखाली त्याची मूर्ती वा तांदळा असतो. पंजाबात त्याला मृत्यूला भिवविणारा देव मानले जाते. भैरव कुत्र्याबरोबर असतो वा त्याच्यावर स्वार होऊन राहतो, म्हणून त्याला श्वाश्व (कुत्रा हा ज्याचा घोडा म्हणजे वाहन आहे, तो) म्हणतात. तो शैवमंदिरांचा द्वारपाल व शक्तिपीठांचा संरक्षक आहे, भैरवाला वगळून शक्तीची पूजा केली, तर ती निष्फळ मानली जाते. शत्रूंचा नाश करण्यासाठी त्याला आवाहन केले जाते.

शेतकरी पेरणीच्या व कापणीच्या प्रसंगी त्याची पूजा करतात. त्याच्यामुळे भूतबाधा, सर्पदंश वगैरेंचा प्रभाव नष्ट होतो, असे मानतात. त्याचे वास्तव्य स्मशानात असल्यामुळे राजस्थानातील भोपे त्याची स्मशानात प्रार्थना करून मग भिक्षेला जातात. तेथे कुमारिकांना त्याच्या देवळात जाऊ देत नाहीत. त्याच्या कृपेने मूल झाल्यास राजस्थानी लोक त्याचे नाव भैरुदान, भैरुबख्श आदी ठेवतात. तो रागावला तर मुलांच्या माना मुरगाळतो, अशी तेथे समजूत आहे.

शैव आगमांनुसार एकूण ६४ भैरवांचे आठ वर्ग असून त्या वर्गांच्या आठ प्रमुखांना 'अष्टभैरव' म्हणतात. तंत्रग्रंथांनुसार ६४ भैरव हे ६४ योगिनींचे स्वामी असतात. अष्टभैरवांच्या नावांविषयी बरेच मतभेद आहेत. संहार वा महासंहार, असितांग, रूरू, काल, क्रोध, ताम्रचूड, कपाल, चंद्रचूड, रुद्रभैरव, चंड, उन्मत्त व भीषण या नावांपैकी वेगवेगळ्या आठ नावांचा अष्टभैरवांत समावेश केला जातो. विद्या, काम, नाग, स्वच्छंद, लम्बित, देव, उग्र व विघ्न या प्रत्येकाला शेवटी 'राज' हे पद जोडूनही ही यादी केली जाते. शांतिकर्मात व शैव व्रताच्या उद्यापनात अष्टभैरवांना आहुती दिली जाते.

अष्टभैरवांपैकी कालभैरवाला काशीचा कोतवाल म्हटले जाते. त्याला पापभक्षण, आमर्दक, काळराज आदी नावेही आहेत. काशीत जाताना प्रथम त्याचे दर्शन घ्यावयाचे व परतताना त्याच्या नावाचा काळा गंडा बांधावयाचा, अशी प्रथा आहे. उज्जैनजवळील भैरवगढ या कोटात त्याचे भव्य मंदिर आहे. आश्विन, कार्तिक व भाद्रपद वद्य अष्टमीला कालाष्टमी हे त्याचे व्रत केले जाते. शेंदूर व तूप यांनी संतुष्ट होणारा एक बालभैरवही आहे. नेपाळमधील नेवार लोक वीरभद्राचे रूप असलेल्या पाचलीभैरवाची पूजा करतात. सूर्य व शिव यांचे संयुक्त स्वरूप असलेल्या मार्तंडभैरवाची त्रिमुखी मूर्ती आढळली आहे. शिवाचे बटुकभैरव नावाचे एक तामसरूपही आढळते. दक्षिण भारतातील शैव मंदिरांची रक्षकदेवता असलेल्या क्षेत्रपालाला महाभैरव म्हणतात. राजस्थानात भूतपिशाचांना ताब्यात ठेवणारे काला व गोरा असे दोन भैरव असून माघ महिन्यात त्यांचा लोकोत्सव असतो. मुसलमान लोक यतिभैरवाची उपासना करतात.

'भीषण गोष्टींना भिवविणारा' या अर्थाने विष्णू व शंकर यांना भैरवतर्जक म्हटले जाते. कालिकापुराणानुसार वारणासीचा राजा व खांडवनाचा निर्माता विजय हा भैरवाचा वंशज होता. भैरव हे नाव धारण करणारे भैरवपुराण, भैरवतन्य आदी ग्रंथ आढळतात. भीतीची भावना निर्माण करणाऱ्या संगीतातील रागाला भैरव असे नाव आहे.

भैरवी हे भैरव या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप असून दुर्गेचे एक रूप, महाविद्यांपैकी सहावी देवी, शिवाच्या दहा शक्तींपैकी एक, आठ अबांपैकी एक, नित्य प्रलय घडवून आणणारी मृत्युशक्ती, दुर्गेच्या महोत्सवात दुर्गेचे काम करणारी १२ वर्षांची मुलगी, हिंदुस्थानी संगीतातील एक राग इ. अर्थांनी हा शब्द वापरला जातो. काशीला मरण पावलेल्या व्यक्तीला सद्गती मिळण्यासाठी भैरव ज्या यातना भोगावयास लावतो, त्यांना भैरवी यातना म्हणतात. भैरव शब्दाचे भैरवा असेही स्त्रीलिंगी रूप असून दुःखाची देवता निर्ऋती व अप्सरांचा एक वर्ग असे त्याचे अर्थ आहेत.

# कालभैरव : कालाचे अधिपती, भगवान शिव यांचे रौद्र रूप

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कालभैरव जयंती किंवा कालाष्टमी ही भगवान भैरवाला समर्पित एक विधी आहे. हिंदू धर्मात भगवान शंकर यांच्या असंख्य रूपांपैकी एक अत्यंत गूढ, उग्र आणि शक्तिशाली रूप म्हणजे कालभैरव. ' काल ' म्हणजे वेळ/मृत्यू आणि ' भैरव ' म्हणजे उग्र. त्यामुळे कालभैरवाचा अर्थ ' कालावर नियंत्रण ठेवणारा ' असा होतो. कालभैरव हे क्रोध, शक्ती आणि न्यायाचे प्रतीक मानले जाते. कालभैरवाची पूजा केल्याने व्यक्ती भयमुक्त होते, असे मानले जाते. या दिवशी पूजा केल्याने शत्रूचे मनसुबे नष्ट होतात आणि यशाच्या शिखरावर पोहोचता येते, असे मानले जाते.

कालभैरव ८ भैरवांच्या नेतृत्वाखाली ६४ भैरवांवर राज्य करीत असत. दरवर्षी हिंदू कॅलेंडरनुसार कार्तिक महिन्यातील कृष्ण पक्षाच्या अष्टमी तिथीला कालाष्टमी साजरी केली जाते. या दिवशी भाविक उपवास करतात आणि देवतेची प्रार्थना करतात. उत्तर भारतातील कालभैरव जयंती मार्गशीर्ष (डिसेंबर-जानेवारी) महिन्यात साजरी केली जाते. तर दक्षिण भारतीय ती कार्तिक (नोव्हेंबर-डिसेंबर) महिन्यात करतात. भगवान शिव यांचे मूळ रहिवासी असे मानतात, की भगवान शिव या दिवशी भैरव स्वरूपात प्रकट झाले. पौराणिक कथेनुसार हा दिवस भगवान कालभैरव यांचा वाढदिवस मानला जातो. लोक योग्य पद्धतीने भगवान कालभैरव यांची पूजा-अर्चा करतात आणि ते भक्तांना आशीर्वाद देतात.

## भगवान महादेवांचा ५ वा अवतार

भगवान महादेव यांचा ५ वा अवतार अणि देवांचे सुरक्षारक्षक श्री कालभैरव महाराजांना ओळखले जाते. या दिवशी दुपारी १२ वाजता भगवान श्री कालभैरवांचा जन्म झाला. या दिवशी दुपारी चार वाजेनंतर श्री कालभैरव महाराजांना पुढीलप्रमाणे विनंती करावी. आम्ही श्री स्वामी समर्थ महाराजांचे सेवेकरी असून, आज आपल्या मान-सन्मानासाठी आम्ही आलो आहोत. या मान-सन्मानाचा स्वीकार करून आपला कृपाशीर्वाद आणि सुरक्षाकवच आम्हाला व परिवाराला मिळावे. तसेच वाईट शक्ती, शत्रू, बाधा यांचा संहार व्हावा.

**नैवेद्य :** त्रिवार मुजरा करून हार, नारळ, खडीसाखर यासह नैवेद्य (वांग्याची भाजी, बाजरीची भाकरी, कांदा व लिंबाची फोड असा नैवेद्य) दाखववा. आपल्या परिसरात जर श्री कालभैरव महाराजांचे मंदिर नसेल, तर आपल्या घरीच फक्त ११ वेळा श्री कालभैरव अष्टक म्हणून सेवा रुजू करावी.

## कालभैरव अवताराची कथा

पुराणानुसार एकदा ब्रह्मा, विष्णू आणि महेश अर्थात भगवान शिव यांच्या श्रेष्ठत्वाचा वाद उद्भवला. त्यावेळी ब्रह्मदेव अंहकाराने म्हणाले, की तेच सर्वोच्च आहेत. ब्रह्मदेवांचा हा अंहकार मोडून काढण्यासाठी भगवान शंकर यांनी आपल्या रुद्र रूपातून एक तेजोमय ज्वाला उत्पन्न केली आणि त्यातून प्रकट झाले कालभैरव. कालभैरवांनी त्याचक्षणी ब्रह्मदेवाच्या पाचव्या मुखाचा अहंकार जाळून टाकला. यानंतर भगवान शंकर यांनी त्यांना ' काशीचे रक्षक ' म्हणून स्थान दिले. तेथूनच त्यांना काशीचे कोतवाल मानले जाते. आजही काशीमध्ये असलेले कालभैरव मंदिर हे अतिशय प्रसिद्ध आणि पूजनीय आहे.



## कालभैरवांचे स्वरूप आणि प्रतीकात्मकता

कालभैरव हे काल, न्याय आणि धर्मरक्षणाचे अधिपती आहेत. त्यांच्या हातात दंड, त्रिशूल, खड्ग आणि कवटी असते. ते श्वानावर (कुत्र्यावर) आरूढ असतात. जो निष्ठा आणि जागरूकतेचे प्रतीक आहे. त्यांच्या रूपातून संदेश मिळतो, की धर्माचे रक्षण करण्यासाठी कधी-कधी उग्रता आणि शिस्त आवश्यक असते. भयावर विजय मिळविण्यासाठी आणि अन्याय नष्ट करण्यासाठी भैरवशक्तीची उपासना केली जाते.

## कालभैरव जयंतीचे महत्त्व

या दिवशी कालभैरवांची पूजा केल्यास कालाचा, मृत्यूचा व अपशकुनांचा भय नष्ट होतो. जीवनातील अडथळे, शत्रू आणि नकारात्मक शक्ती दूर होतात. भैरव मंत्राचा जप केल्यास मनाची स्थिरता आणि आत्मविश्वास वाढतो. ही जयंती भैरवाष्टमी म्हणूनही ओळखली जाते. भक्त या दिवशी उपवास करतात. रात्रभर जागरण करून ' ओम ऱ्हीं भैरवाय नमः ' हा जप करतात आणि कालभैरवांना काले तीळ, तेलाचा दिवा, काली उडीदडाळ आणि नारळ अर्पण करतात.

## काशी आणि कालभैरव

वाराणसी (काशी) हे भगवान शंकर यांची नगरी आहे. तिचे रक्षण स्वतः कालभैरव करतात, असे मानले जाते. म्हणूनच प्रत्येक तीर्थयात्री प्रथम कालभैरव यांचे दर्शन घेऊन नंतर काशी विश्वनाथांचे दर्शन घेतो. कालभैरव यांना येथे काशीचा कोतवाल असे म्हटले जाते. जे प्रत्येकाच्या कर्मांचे रक्षण आणि न्यायनिवाडा करतात.

कालभैरव हे फक्त उग्र देव नसून ते काल आणि मृत्यूच्या भयावर विजय मिळविण्याचे प्रतीक आहेत. जीवनात येणाऱ्या अडचणी, नाश, मृत्यू या सर्व गोष्टींचा स्वीकार करूनच माणूस मोक्षाच्या मार्गावर चालतो. भैरवपूजा म्हणजे भीतीवर विजय, आत्मनियंत्रण आणि कालाच्या पलीकडे जाण्याचा आध्यात्मिक प्रवास. या दिवशी केलेली पूजा, जप आणि ध्यान हे केवळ धार्मिक कर्मकांड नाहीत, तर ते मन, वेळ आणि कर्मावर प्रभुत्व मिळविण्याचे साधन आहेत.

# कालभैरवाष्टक

कालभैरवाष्टक हे शंकराचार्यांनी भगवान कालभैरवाची स्तुती असून नवव्या श्लोकात फलश्रुती आहे. फलश्रुती म्हणजे स्तोत्र पठण केल्याने त्यापासून मिळणारे फायदे होय. काळभैरव ही देवता भगवान शंकराचा अवतार मानली जाते. कालभैरवाचे मंदिर काशी शहराच्या वेशीवर आहे. त्यांना काशीचे कोतवाल असे म्हणतात. ही भलेही उग्र आणि तापट देवता असली तरीही ती न्यायप्रिय असल्यामुळे आपल्या भक्तांचे रक्षण करते असे मानले जाते.

**स्तोत्रम्**

ॐ देवराजसेव्यमानपावनाङ्घ्रिपङ्कजं
व्यालयज्ञसूत्रमिन्दुशेखरं कृपाकरम्
नारदादियोगिवृन्दवन्दितं दिगंबरं
काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ॥१॥

**अनुवादः** साक्षात देवराज इंद्र ज्यांच्या चरणांची सेवा करतात, ज्यांनी शरीरावर सर्प रुपी यज्ञोपवीत, आणि डोक्यावर चंद्र धारण केलेले आहेत. दिशा हे ज्यांचे वस्त्र आहेत आणि नारदादी योगीवृंद ज्यांना आदराने वंदन करतात, अशा या काशीपुरीच्या कालभैरव स्वामींची मी आराधना करतो.

भानुकोटिभास्वरं भवाब्धितारकं परं
नीलकण्ठमीप्सितार्थदायकं त्रिलोचनम ।
कालकालमंबुजाक्षमक्षशूलमक्षरं
काशिका पुराधिनाथ कालभैरवं भजे ॥२॥

**अनुवाद :** ज्यांना तीन डोळे आणि निळा कंठ आहे आणि ज्यांचे कोट्यवधी सूर्यप्रकाशसम तेज आहे, ते निश्चितच संसाररूपी भवसमुद्र तरुन जाण्यास सहाय्यक आहेत. जे अक्षय असून काळाचे महाकाळ आहेत, ज्यांचे नेत्र कोमल आहेत, ज्याचे त्रिशूळ समस्त विश्वाचा आधार आहे, अशा या काशीपुरीच्या कालभैरव स्वामींची मी आराधना करतो.

शूलटङ्कपाशदण्डपाणिमादिकारणं
श्यामकायमादिदेवमक्षरं निरामयम् ।
भीमविक्रमं प्रभुं विचित्रताण्डवप्रियं
काशिका पुराधिनाथ कालभैरवं भजे ॥३॥

**अनुवाद :** ज्यांनी हातात त्रिशूळ, भाला, पाश, दंड इत्यादी धारण केलेले आहेत. सावळा रंग असून जे निरामय असून विश्वाच्या आरंभापासून अस्तित्वात आहेत, जे महापराक्रमी असून अदभुत तांडव करतात, अशा या काशीपुरीच्या कालभैरव स्वामींची मी आराधना करतो.

भुक्तिमुक्तिदायकं प्रशस्तचारुविग्रहं
भक्तवत्सलं स्थितं समस्तलोकविग्रहम् ।
विनिक्वणन्मनोज्ञहेमकिङ्किणीलसत्कटिं
काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ॥४॥

**अनुवादः** जे आपल्या भक्तांना भुक्ती आणि मुक्ती प्रदान करतात, ज्यांचे स्वरूप प्रशस्त आणि सुंदर आहे, ज्यांचे चारही लोकांत सामावलेले आहे, जे आपल्या भक्तांवर ममत्वाचा वर्षाव करतात, ज्यांच्या कमरेला मंजुळ आवाजात किणकिणाऱ्या घंट्या आहेत, अशा या काशीपुरीच्या कालभैरव स्वामींची मी आराधना करतो.

धर्मसेतुपालकं त्वधर्ममार्गनाशकं
कर्मपाशमोचकं सुशर्मदायकं विभुम् ।
स्वर्णवर्णशेषपाशशोभिताङ्गमण्डलं
काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ॥५॥

**अनुवादः** जे धर्ममार्गाचे पालक तथा रक्षक असून अधर्माचा नाश करतात, ते दिसण्यास आनंददायी असून भक्तांच्या जन्मोजन्मीच्या कर्मपाशाचा नाश करतात. सर्पांनी शरीर वेढल्यामुळे जे शोभून दिसताहेत, अशा या काशीपुरीच्या कालभैरव स्वामींची मी आराधना करतो.

रत्नपादुकाप्रभाभिरामपादयुग्मकं
नित्यमद्वितीयमिष्टदैवतं निरञ्जनम् ।
मृत्युदर्पनाशनं कराळदंष्ट्रमोक्षणं
काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ॥६॥

**अनुवाद :** पायात रत्नजडित पादुका धारण केल्यामुळे जे सुशोभित झाले आहेत आणि नित्य निर्मल, अविनाशी, अद्वितीय असून भक्तप्रिय आहेत. जे मृत्यूचा अहंकार दूर सारून आपल्या भयावह दातांनी काळापासून भक्तांचे रक्षण करतात, अशा या काशीपुरीच्या कालभैरव स्वामींची मी आराधना करतो.

अट्टहासभिन्नपद्मजाण्डकोशसन्ततिं
दृष्टिपातनष्टपापजालमुग्रशासनम् ।
अष्टसिद्धिदायकं कपालमालिकन्धरं
काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ॥७॥

**अनुवाद :** ज्यांच्या विकट हास्याने संपूर्ण ब्रम्हांड विदीर्ण होते आणि ज्यांच्या एका दृष्टीकटाक्षाने सर्व पापांचा नाश होतो, तसेच ज्याचे शासन कठोर असून आपल्या भक्तांना जो सर्व प्रकारच्या सिद्धी देतो, अशा या नरमुंड धारक काशीपुरीच्या कालभैरव स्वामींची मी आराधना करतो.

भूतसङ्घनायकं विशालकीर्तिदायकं
काशिवासलोकपुण्यपापशोधकं विभुम् ।
नीतिमार्गकोविदं पुरातनं जगत्पतिं
काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ॥८॥

**अनुवादः** जो समस्त भूत संघाचा नायक असून विशाल किर्तीदायक आहे, तसेच तो काशीपुरीत राहणाऱ्या भक्तांच्या पाप-पुण्याचा हिशोब ठेवतो. ज्याला नीती आणि अनितीच्या मार्गाची जाण आहे तसेच तो अत्यंत प्राचीन काळापासून जगाचा स्वामी आहे, अशा या काशीपुरीच्या कालभैरव स्वामींची मी आराधना करतो.

कालभैरवाष्टकं पठन्ति ये मनोहरं
ज्ञानमुक्तिसाधनं विचित्रपुण्यवर्धनम् ।
शोकमोहदैन्यलोभकोपतापनाशनं
ते प्रयान्ति कालभैरवाङ्घ्रिसन्निधिं ध्रुवम् ॥९॥

**अनुवादः** जे लोक अशा या मनोहर कालभैरवाष्टकाचे निरंतर पठण करतात, त्यांना ज्ञान तथा मुक्तीचा लाभ होतो. तसेच त्यांच्या सर्व शोक, मोह, दैन्य, लोभ, कोप आणि ताप इत्यादींचा नाश होतो. अशा प्रकारे हे लोक अंती कालभैरवाच्या चरणी आपले स्थान प्राप्त करतात.
॥ इति श्रीमच्छङ्कराचार्यविरचितं कालभैरवाष्टकं संपूर्णम्

